QP: 3487

**वेळ : 3 तास** **एकूण गुण : १००**

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्रश्न १.** **अ.** ललित गद्याचे स्वरूप स्पष्ट करून 'व्यक्तिचित्रण' आणि 'प्रवासवर्णन' या तिच्या प्रमुख लेखनस्वरूपाची विस्ताराने चर्चा करा. **२०**

**किंवा**

**ब.** ललित गद्य म्हणजे काय हे सांगून मराठीमधील ललित गद्यलेखनाचा परिचय करून द्या.

**प्रश्न २.** **अ.** 'वडीलधारी माणसे' या लेखसंग्रहात चित्रित श्री. म. माटे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून द्या. **२०**

**किंवा**

**ब.** 'वडीलधारी माणसे' या लेखसंग्रहाच्या आधारे आशा भोसले यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा उलगडा करा.

**प्रश्न ३.** टिपा लिहा. **(कोणतेही दोन)** **१०**

१. ललित गद्याच्या मर्यादा
२. लता मंगेशकर यांचा स्नेहभाव
३. दुर्गाबाई भागवत यांचा वाचन व्यासंग
४. आचार्य अत्रे यांची विनोदबुद्धी

**प्रश्न ४.** मराठी लेखन नियमासंबंधी पुढील प्रश्न सोडवा.

**अ.** मराठीतील स्वल्पविराम, अर्धपूर्णविराम, पूर्णविराम, प्रश्नार्थक चिन्ह आणि उद्गारवाचकचिन्ह यांचा वापर कधी होतो ते सांगून प्रत्येकी एक उदाहरण द्या. **०५**

**किंवा**

मराठीतील कोणतीही पाच विरामचिन्हे आणि त्यांची प्रत्येकी एक उदाहरणे द्या.

**ब.** पुढील एका परिच्छेदामध्ये विरामचिन्हांचा वापर करून पुन्हा लिहा. **०५**

राहणीमानाच्या परिस्थितीचा परिणाम दोन तऱ्हेने होत असावा तो प्रत्यक्षपणे संपूर्ण संघटनेवर किंवा केवळ विशिष्ट भागावरच आंन अप्रत्यक्षपणे जनन संस्थेवरच

परिणाम घडवून याला दोन कारणे आहेत एक सजीवाचे स्वरूप आणि दुसरे परिस्थितेचे स्वरूप यापैकी संजीवचे स्वरूप अतिशय महत्त्वाचे आहे.

**प्रश्न ५ अ. वृत्तलेखन करा. (कोणतेही एक)** १०

मराठी चित्रपटक्षेत्रातील कसदार आणि दीर्घकाळच्या कामगिरीनिमित्त दिलीप प्रभावळकर यांना जाहीर झालेल्या जीवन गौरव पुरस्काराविषयी वृत्तलेखन करा.

**किंवा**

ब. महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सुसज्ज ग्रंथालय आणि अभ्यासिकानिर्मितीच्या नव्या शासननिर्णयाची माहिती देणारे वृत्तलेखन करा.

**प्रश्न ६. अ. वृत्तान्तलेखन करा. (कोणतेही एक)** १०

लोककला महोत्सव सप्ताहाच्या अंतर्गत महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या लोककला सादरीकरण महोत्सवाचे वृत्तान्तलेखन करा.

**किंवा**

ब. नवोदित कादंबरीकारांसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने आयोजित केलेल्या तीन दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे वृत्तान्तलेखन करा.

**प्रश्न ७. अ. अर्जलेखन करा. (कोणतेही एक)** १०

गोरेगाव (प.) येथील नूतन मराठी विद्यालयात इतिहास विषयाच्या शिक्षकपदासाठी मुख्याध्यापकांच्या नावे अर्जलेखन करा.

**किंवा**

ब. मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथसंग्रह कक्ष काही नियम आणि अटींवर आठवड्यातील किमान तीन दिवस तरी विद्यार्थ्यांसाठी खुली राहावी, यासाठी ग्रंथपालांच्या नावे विनंती अर्ज करा.

**प्रश्न ८. भाषांतर करा.** १०

India not just the land, Mountains and Rivers. India is you and me, all the millions of young and old. The thought and actions of the people who have inhabited India for thousands of year have mailed our society. Out of the past grows the present and what we do today will shape our future.